दै. गोदातीर समाचार दि. ०५/१२/२२

# गावठी पिस्टल बाळगणारा स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात

**नांदेड-** गावठी पिस्टल बाळगणाऱ्या एकास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे.

माली गुन्ह्यातील व अवैध शस्त्र बाळगणाऱ्यां आरोपीतांची माहीती काढून शोध घेऊन त्यांच्याविरुध्द कायदेशिर कारवाई करण्याबाबतच्या सुचना पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांना दिल्या होत्या. त्यानुसार स्थागुशाच्या पथकाने बळीराम पूर परिसरातून एकाला अटक केली. त्यांच्याकडून एक गावठी पिस्तूल जप्त केला. दिनांक चार डिसेंबर रोजी पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे हे आपल्या पथकासह नांदेड शहरातील बळीरामपुर भागात



गस्त घालत होते. यावेळी त्यांनी एका युवकाला संशयावरून ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता त्यांच्या ताब्यातून पिस्टल जप्त केले. बळीरामपुर, नांदेड येथे जावून नामदेव तुळशीराम शिवभक्ते (वय २२) असे त्याचे नाव सांगितले. सदरचे पिस्टल किंमती २० हजार रुपयाचे दोन पंचासमक्ष जप्त करुन पोउपनि दत्तात्रय काळे यांच्या फिर्यादीवरुन पो स्टे नांदेड ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.